
# फुले-शाहू आंबेडकर

## विचारांची प्रासंगिकता




संपादक -

- डॉ. मनिष सोनवणे

उपसंपादक -

- डॉ. सी.डी. राजपूत
- प्रा. उद्धव कुडासे
- प्रा. अजय अहिर
- प्रा. अशोक वाघचौरे


Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

# फुले-शाहू-आंबेडकर विचारांची प्रासंगिकता

संपादक
डॉ. मनिष सोनवणे
उपसंपादक
डॉ. सी. डी. राजपूत
प्रा. उद्धव कुडासे
प्रा. अजय अहीर
प्रा. अशोक वाघचौरे

अथर्व पब्लिकेशन्स

Scanned by CamScanner
Scanned by CamScanner

अथर्व पब्लिकेशन्स

फुले–शाहू–आंबेडकर विचारांची प्रासंगिकता

© सुरक्षित

ISBN : 978-93-91712-88-4
पुस्तक प्रकाशन क्र. ९१९

**प्रकाशक व मुद्रक**
युवराज भटू माळी
**अथर्व पब्लिकेशन्स**
**धुळे :** १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे- ४२४ ००१.
**संपर्क :** ९४०५२०६२३०
**जळगाव :** शॉप नं. २, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी, तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव- ४२५ ००१.
**संपर्क :** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
**ई–मेल :** atharvapublications@gmail.com
**वेबसाइट :** www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** १९ फेब्रुवारी २०२२
**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स
**मूल्य :** ७००

**E-Book *available on***
**amazon.in ▪ GooglePlayBooks ▪ atharvapublications.com**

**ऑनलाइन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com**

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.



Scanned by CamScanner
Scanned by CamScanner

## अनुक्रमणिका


१ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रातून प्रेरित झालेले शिक्षणविषयक दृष्टिकोन ....................२१
- अविनाश कैलास पवार

२ दलित ऐक्य का होत नाही? ....................२९
- डॉ. प्रकाश मारुती पवार

३ महात्मा फुले : महाराष्ट्रातील पुरोगामी समाजसुधारक ....................३४
- डॉ. सी. डी. राजपूत

४ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची मशाल खेडोपाडी पोहोचविणारा लोकशाहीर–अण्णा भाऊ साठे ....................३८
- डॉ. अर्जुन गंगाराम नेरकर

५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कामगार चळवळ....................४३
- प्रा. अजय एकनाथ अहीर

६ सावित्रीबाई : एक समाज प्रबोधनकार ....................५०
- डॉ. मीनाक्षी पाटील

७ राजर्षी शाहू महाराज : एक 'सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष'....................५५
- प्रा. अशोक भावराव वाघचौरे

८ राजर्षी शाहू महाराज : एक आदर्श राज्यकर्ता ....................६१
- डॉ. स्नेहल संजय मराठे

९ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक तत्त्वज्ञान....................६६
- प्रा. उदय खंडू टेके

१० डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्य समाजवादी विचारांची प्रासंगिकता ....................७४
- प्रा. प्रदीप उत्तम वेताळ




Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची मशाल खेडोपाडी पोहोचविणारा लोकशाहीर – अण्णा भाऊ साठे

– डॉ. अर्जुन गंगाराम नेरकर
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,
मालेगाव कॅम्प, मालेगाव, जि. नाशिक

दलित साहित्याच्या प्रेरणास्थानी तथागत गौतम बुद्ध, महात्मा जोतिराव फुले, कार्ल मार्क्स आणि मुख्यत्वे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आहेत. महाराष्ट्र ही बंडखोरांची जन्मभूमी आहे, कर्मभूमी आहे. अन्याय, जुलूम यांच्याविरुद्ध बंडाचे निशाण उभे करून सर्वस्व समर्पण करणाऱ्या थोर बंडखोरांची परंपरा या देशात आहे. अन्याय, गुलामगिरी, दारिद्र्य, द्वेष, वर्चस्व, पारतंत्र्य, हिंसा इत्यादी कुरूपतेने समाजजीवन जेव्हा होरपळू निघते, तेव्हा बंडाचा झेंडा जमवून जिकडे-तिकडे धामधूम उडवून 'सत्वाचा उदयोस्तु' करावयाची मनीषा महापुरुषांच्या मनात अंकुरते. हीच मनीषा उरी बांधून डॉ. बाबासाहेबांनी आपले आयुष्य वेचले, समाजक्रांतीसाठी सर्वस्व पणाला लावणारे डॉ. बाबासाहेब भारताचे एक महापुरुष होते. हाच वारसा घेऊन अण्णा भाऊ साठे यांनी आपली वेगळी कथा साकार केली आहे. अण्णा भाऊ साठे असे म्हणतात की, मी जे जीवन जगतो, पाहतो, अनुभवतो तेच मी लिहितो. मला कल्पकतेचे पंख लावून भरारी मारता येत नाही. त्याबाबतीत मी स्वतःला बेडूक समजतो.[१] एकंदरीत अण्णा भाऊंना असे सूचित करायचे आहे की, त्यांची कथा स्वप्नरंजनात रमत नाही, ती वास्तव विश्व उभी करते. म्हणजेच त्यांच्या कथेतील व्यक्ती का जगत आहेत? जगण्यासाठी का लढावे लागत आहे? त्यांच्या जगण्याला दिशा नाही. या सर्वांच्या मुळाशी समाजव्यवस्था आहे.

अण्णा भाऊंच्या कथेतील माणसांची – मग ती मुंबईच्या गलिच्छ वस्त्यांमध्ये जनावरासारखे जीवन जगणारी असोत किंवा वारणेच्या खोऱ्यात एखाद्या हजार-पाचशे वस्तीच्या खेड्यातील असोत, ती जीवनाला उबगलेली नाहीत. मात्र, त्यांना जगण्यासाठी क्षणाक्षणाला झगडावे लागते, लढावे लागते. पोटासाठी माणूस काय करीत नाही? पोट पाठीस लागले आहे, त्याला माणूस काय करील? म्हणून माणूस पोटासाठी खोटे बोलतो, चोरी करतो, बेईमानी करतो. आजच्या समाजरचनेत जाळण्यासाठी केवळ केलेले कृत्य, सामाजिक



Scanned by CamScanner
Scanned by CamScanner

गुन्हा या सदरात समाविष्ट होते. खरेतर अण्णा भाऊ साठेंचे विचार आणि साहित्य अजूनही समाजापर्यंत पोहोचलेले नाही. व्यवस्थेने आजही अण्णा भाऊंना उपेक्षित ठेवले. आपण अण्णा भाऊ साठे यांना फक्त जातीने ओळखतो. कीर्तीने ओळखत नाही. जातीचा पगडा डोक्यावर असल्यामुळे आपण अनेक विद्वान लोकांच्या ज्ञानाला कार्याला मुकलो, ही आपली शोकांतिका आहे. कामगारांना जात नसते, उपेक्षितांना जात नसते, तर तो एक समाज असतो. सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम करणारा नायक म्हणजे अण्णा भाऊ साठे होय.

अण्णा भाऊंच्या लेखणीमध्ये प्रामाणिकपणा, संघर्ष, मेहनत, स्वाभिमान, ओत-प्रोत भरलेला दिसून येतो. अण्णा भाऊ साठे यांचा संघर्ष शोषकविरुद्ध शोषित असाही होता. कामगारांचे शोषण करून भांडवलदारांचे पोषण होते म्हणून भांडवलशाही विरोधात कामगारांचा आवाज अण्णा भाऊ साठे बनत होते. अण्णा भाऊ साठे यांना मानवाचे संपूर्ण स्वातंत्र्य पाहिजे होते. कामगारांचे, उपेक्षितांचे शोषण थांबवून त्यांना न्याय मिळावा यासाठी त्यांचा लढा होता. १५ ऑगस्ट १९४७ रोजी संपूर्ण देशाने स्वातंत्र्य दिवस साजरा केला. परंतु १६ ऑगस्ट १९४७ रोजी अण्णा भाऊ साठे यांनी लाखोंच्या सभेमध्ये भरपावसात 'ये आझादी झुठी है देश कि जनता भूखी है'[२] अशा रीतीने सर्वसामान्य लोकांना, उपेक्षितांना, कामगारांनाही स्वातंत्र्य लागूच नाही अशा प्रकारचे मत मांडून मानवी स्वातंत्र्याची अपेक्षा व्यक्त केली होती. ज्याप्रमाणे डॉ. बाबासाहेबांचा लढा मानवी स्वातंत्र्यासाठी होता. लोकांना हक्क, अधिकार बहाल करून, शोषण थांबवण्याचा होता. उपेक्षित, अस्पृश्य, मागास समाजाला सत्तेची दारे खुली करणे म्हणजे स्वातंत्र्य दिन याच धर्तीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवी स्वातंत्र्याची लढाई लढली. त्याच धर्तीवर अण्णा भाऊ साठे यांचा १६ ऑगस्ट १९४७ चा मोर्चा म्हणजे उपेक्षित कामगारांना वास्तव स्वातंत्र्य मिळण्याचा एल्गार होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लिखाणामध्ये जी सत्यता, जो स्वाभिमान दिसून येतो, जो परिवर्तनासाठी प्रबोधनाचा मारा दिसून येतो, तीच शैली अण्णा भाऊ साठे यांनी अवगत केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लेखणी समाजात ऊर्जा निर्माण करण्याचे काम करत होती, तर अण्णा भाऊंची लेखणी सुद्धा समाजाला ऊर्जा निर्माण करण्यासाठी काम करत होती.

अण्णा भाऊंची 'फकिरा' ही कादंबरी स्वाभाविक, संघर्ष आणि लढा शिकविणारी वास्तव साहित्यकृती आहे.

'जग बदल घालूनी घाव
मज सांगून गेले भीमराव'

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घेऊन उपेक्षित, शोषितांना न्याय



Scanned by CamScanner
Scanned by CamScanner

देण्याचे काम अण्णा भाऊ साठे यांनी केले. अण्णा भाऊ साठे यांची कादंबरी, कथा, नाटक यामध्ये सच्चेपणा दिसतो .अण्णा भाऊंचे साहित्य हे नैराश्यातून संघर्षाकडे आणि संघर्षातून व्यवस्था परिवर्तनाकडे नेते. म्हणून अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य वाचल्यावर संघर्ष आणि अन्यायाचा विरोध करणारा भारतीय समाज निर्माण करणे गरजेचे आहे, असे त्यांना वाटते. माणुसकीसाठी आणि पोटासाठी बेभान झालेल्या माणसांच्या जीवनाचे चित्रण त्यांनी केले. सुरुवातीच्या कथेत दलित हा लाचार, दीन, दुबळा, अन्याय सहन करणारा अशाप्रकारचा रेखाटला. 'खुळंवाडी' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. यातील नायक-नायिका दलित आहेत. दारिद्र्यामुळे त्यांची उपासमार होते. भूक ही त्यांच्यापुढे जीवन-मरणाचा प्रश्न उभा करते पण तेथील व्यक्ती भुकेसाठी लाचार नाही. अण्णा भाऊंच्या कथा, कादंबऱ्यांमधील नायक-नायिका अन्याय नष्ट करण्यासाठी हातात कुऱ्हाड आणि बंदूक घेऊन येतात. त्यांच्या कथा-कादंबरीतील व्हिलन हा उच्चवर्णीय जमीनदार व इनामदार असतो. याचे उदाहरण आपणास 'फकिरा' ही कादंबरी देता येईल. हे गावातील व्हिलन फक्त दलितांचेच नाही तर गावातील गरिबांचेही शोषण करतात. त्यांना संपवणे म्हणजेच अन्याय- अत्याचाराचा अंत करणे असे अण्णा भाऊंना सतत वाटत राहते.

नवकथा युगात अल्पशिक्षित अण्णा भाऊ तळागाळातील माणसांच्या कथा लिहितात. 'खुळंवाडी' संग्रहात आचार्य अत्रे यांनी प्रस्तावनेत अण्णाभाऊंच्या कथेचे वर्णन करताना म्हटले आहे की, जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांच्या कथा[३] अशी स्पष्टोक्ती दिली आहे. प्रादेशिकता, ग्रामीणता याचं वैभव त्यांच्या साहित्यात येते. मार्क्सवादी प्रेरणा त्यात असते. पण मार्क्सवादाचा प्रचार कधीच नाही. याविषयी प्रा. रा. ग. जाधव म्हणतात, दलित, पीडित जगाचा हा पहिला लेखक व भाष्यकार आहे. अण्णा भाऊंनी दलित साहित्य निर्मितीला एक विधायक अधिष्ठान दिले. दलित लेखकांसाठी एक पायवाट तयार करून ठेवली.[४] (निळी पहाट) याची प्रचिती आपणास 'फकिरा' आणि 'खुळंवाडी'मधील कथा वाचताना जाणवते. गावाची ओळख नसताना कामगारांचा नेता होणे हे सोपे काम नाही. मुंबई महाराष्ट्रात असावी की गुजरातमध्ये हा वाद पेटला असताना मुंबई महाराष्ट्रात राहण्यासाठी समाजामध्ये जाऊन जनसमर्थन मिळविण्यासाठी हातात डफ घेऊन तरुणांमध्ये ऊर्जा भरणारा नेता म्हणजे अण्णा भाऊ साठे होय. परिणामांची पर्वा न करता, पोलिसांना न जुमानता, मुंबईसाठी लढा उभा करणारा सैनिक म्हणून अण्णा भाऊंचा नामोल्लेख केला जातो. गोवा मुक्तिसंग्रामात देखील भाग घेऊन गोवा भारतात विलीन झाला पाहिजे यासाठी संघर्ष करणारे देखील अण्णा भाऊ होते. आपल्या शाहिरीच्या माध्यमातून लोक प्रबोधन करणारे अण्णा भाऊ



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

आपल्या एका कवितेत म्हणतात, 'माझी मैना गावाकडे राहिली.' त्यांची ही मैना म्हणजे त्यांची बायको किंवा प्रेयसी नाही, तर गावातील जनतेला उद्देशून म्हटले आहे. या सगळ्या विचारांमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा आहे. म्हणून अण्णा भाऊ साठे हे डॉ. बाबासाहेबांना गुरू मानतात. अण्णा भाऊंचे साहित्य जर वाचले तर त्यातून आपणास जगण्याचे बळ मिळते. अण्णा भाऊंची कथा पारंपरिक वळणाची पण आशावादी आहे. ती व्यक्ती प्रधान आहे. एखाद्या व्यक्तीच्या संघर्षाची कहाणी सांगण्यावर त्यांचा भर असतो. वारणेच्या खोऱ्यातील खेड्याचे आणि मुंबईतील गलिच्छ वस्तीतून राहण्याचे बोलके चित्रण त्यांनी रेखाटले. दलित जीवनातील आशा-आकांक्षा, निष्ठा यांचे दर्शन अण्णा भाऊंनी घडविले आहे. वारणा खोऱ्याचा परिसर त्यांनी आपल्या लेखणीतून जिवंत केला आहे. झोपडपट्टीतील गरिबांच्या व मागासवर्गीयांच्या व्यथाही रेखाटल्या आहेत. प्रा. रा. ग. जाधव 'निळी पहाट' मध्ये म्हणतात, अण्णा भाऊंनी दलितांच्या, पतितांच्या, भणंग भिकाऱ्यांच्या, तथाकथित दरोडेखोरांच्या नि बंडखोरांच्या अर्थशून्य मानल्या गेलेल्या जीवनात माणुसकीची अर्थपूर्णता असल्याचे दाखवून दिले.[५]

अण्णा भाऊ साठे यांनी खुळंवाडी, बरबाद्या कंजारी, भानामती, कृष्णाकाठच्या कथा, गजाआड, गुऱ्हाळ, चिरागनगरीची भूतं, फरारी, काडतूस इत्यादी कथासंग्रह लिहून समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या कथेतील नायक नायिका अतिशय बोलके आहेत. परिस्थितीचा प्रतिकार करणारे आहेत. उदा. 'वळण' या कथेमध्ये महार समाजातील जुन्या-नव्या पिढीचा संघर्ष दाखविण्यात आला आहे. सत्तरीच्या पुढे वय असलेली निराधार चीमा महारीण ही जुन्या पिढीचे प्रतिनिधित्व करते. जनावरांचे मांस खाण्याच्या प्रश्नावरून चिमा महारीण व महारवाडा, तसेच महारवाडा व मांगवाडा यातील संघर्षाचे चित्रण या कथेतून साकार केले आहे. तसेच 'बरबाद्या कंजारी' या कथेमधून देशातील माणसे कशी जगतात आणि स्वतंत्र भारततही काळोखात त्यांना कसे राहावे लागते. यातनामय जीवन जगावे लागते, याचे बोलके चित्र अण्णा भाऊंनी रेखाटले आहे. तर 'स्मशानातील सोनं' यात रात्री स्मशानात जाऊन प्रेताच्या तोंडातील सोनं काढून पोटाची खळगी भरण्याचा प्रयत्न करणारा भीमा आपल्या अंगावर रोमांच उभा करून जातो. 'मरीआईचा गाडा' ही कथा परिवर्तनाशी नाते सांगणारी आणि सामाजिक आंदोलनांना प्रेरणा देणारी अशी ठरते. अण्णा भाऊ साठेंची शैली रंजक असल्यामुळे त्यांची कथा वाचनीय असते. म्हणी आणि वाक्प्रचार यांचा वापर मोठ्या प्रमाणात असल्याने कथा परिणामकारक व प्रवाही दिसते. तसेच अण्णा भाऊंच्या लेखणीचे खास वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या कथा, कादंबऱ्यांमधून



Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

मोठ्या प्रमाणावर बोली भाषेचा केलेला वापर होय.

जगाचा इतिहास बदलून टाकणारा व्यक्ती म्हणजे अण्णा भाऊ साठे होय. अण्णा भाऊ साठे यांची लोकशाहीर, साहित्यसम्राट म्हणून ओळख निर्माण झाली खरी पण समाजामध्ये अण्णा भाऊंचे साहित्य आणि विचार अजूनही पोहोचलेले नाहीत. व्यवस्थेने अण्णा भाऊंना आजही उपेक्षित ठेवले आहे. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाच्या आदेशावरून चालना देणारे ठरते. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात अण्णा भाऊंच्या साहित्याचे योगदान फार मोठे आहे. माझी जीवनावर फार निष्ठा असून मला माणसं फार आवडतात. त्यांची श्रमशक्ती महान आहे. ती जगतात ती जगाला जगवतात. म्हणून अण्णा भाऊंच्या कथेत विफलतेचे सूर आढळत नाहीत. ग्रामीण जीवनाचे आणि दारिद्र्याने पिडलेल्या मुंबईच्या गलिच्छ वस्त्यांमधून राहणाऱ्या व्यक्तींचे अत्यंत बोलकि आणि जिवंत चित्रण अण्णा भाऊंनी रेखाटले आहे, त्याला तोड नाही.

**संदर्भ**


१. दलित साहित्य वेदना विद्रोह- भालचंद्र फडके (पृष्ठ क्रमांक १८०)
२. ग्रामीण दलित साहित्य : चळवळ आणि समीक्षा- डॉ. मधुकर मोकाशी.
३. अण्णा भाऊ साठे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वैचारिक वारस (पृष्ठ क्रमांक ३१)
४. दलित साहित्याचा इतिहास – प्राचार्य डॉ. म. सु. पगारे (पृष्ठ क्रमांक ३४,)
५. दलित साहित्य – डॉ. नीला पांढरे (पृष्ठ क्रमांक ५५)




Scanned by CamScanner
Scanned by CamScanner